# पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद वाशिम पशुसंवर्धन विभागाअंतर्गत संवर्गनिहाय प्रशासकिय व विनंतीनुसार समुपदेशनाने स्थानांतर करावयाचे दिनांक-१४/०५/२०१८ च्या सभेचे इतीवृत्त.

जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत बदल्याची प्रक्रीयेकरीता शासनाचे पत्र क्रमांक जिपब-४१४/ प्र.क्र.११२/आस्था-१४,मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १५ मे २०१४ नमुद केल्या नुसार पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत दिनांक १४/०५/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.अध्यक्ष मा.उपाध्यक्ष जि.प.वाशिम, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम,मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद वाशिम तसेच सर्व विभागाचे अधिकारी ,विभाग प्रमुख व ईतर कर्मचारी तसेच पशुधन पर्यवेक्षक प्रशासकिय व विनंती वरून बदलीस पात्र कर्मचा-यांची समुपदेशनाने बदली प्रक्रीया जिल्हा परिषद सभागृहात घेण्यात आली .

**समुपदेशनाने करावयाच्या स्थानांतराबाबत खालील प्रमाणे सुचना करण्यात आल्यात .**

- प्रशासकिय बदल्या प्रथम करण्यात येतील .
- प्रशासकिय बदल्यासाठी पशुसंवर्धन विभागाची पशुधन पर्यवेक्षक व पट्टीबंधक संवर्गाची पात्र कर्मचा यांची यादी दिनांक १७/४/२०१८ रोजी प्रकाशीत करण्यात आली आहे.त्यानुसार संबंधीत बदली पात्र कर्मचा-यांकडून प्राप्त तक्रारीची शहानिशा करून अंतिम वास्तव्य जेष्ठता यादी दिनांक १०/०५/२०१८ नुसार प्रसिध्द करण्यात आलेली होती. प्रशासकिय बदल्या मध्ये शासनाचे पत्र क्रमांक जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४,मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १५ मे २०१४ मधे प्रकरण (१) ३ (अ) (ब) (क) (ग) (घ) तसेच ४(१) (२)(३) (४) प्रमाणे एकही कर्मचारी बदली पात्र नाही.
- उपरोक्त पशुधन पर्यवेक्षक संवर्गा मध्ये मुख्यालयामध्ये १० वर्षे सेवा झालेले एकही कर्मचारी नाही त्यामुळे प्रशासकिय बदली मध्ये करता येणार नाही असे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी सांगीतले.

सहाय्यक पशुधन विकास अधिकारी संवर्गामधे १० वर्षे सेवा झालेले एकही कर्मचारी प्रशासकीय बदल्यामधे पात्र नसल्याने त्यांच्या बदल्या करण्यात आल्या नाहीत. त्याच प्रमाणे वर्ग ४ मधील पट्टीबंधक संवर्गामध्ये ०१ विनंती अर्ज प्राप्त असुन सदर कर्मचारी समुपदेशनास उपस्थित नसल्यामुळे बदली करण्यात आलेली नाही व त्याच प्रमाणे प्रशासकिय स्थानांतरण प्रस्तावीत नसल्याने त्यांचे स्थानांतर करण्यात आले नाही.

**तसेच विनंती नुसार कर्मचा-यांच्या स्थानांतराबाबत खालील प्रमाणे सुचना देण्यात आल्या.**

- प्राप्त विनंती अर्जावरून कर्मचा-यांची यादी प्रसिध्द करण्यात आली .
- विनंती नुसार स्थानांतर पाहीजे असलेल्या कर्मचा-यांची माहिती घेवून रिक्त पदाची सुध्दा माहिती घेण्यात आली
-

त्या नंतर पशुधन पर्यवेक्षक संवर्गामधे प्राप्त झालेल्या अर्जा नुसार तसेच वास्तव्य सेवाजेष्ठता क्रमानुसार विनंतीवरून बदलीच्या यादीची विकल्पानुसार समुपदेशनाने पशुधन पर्यवेक्षकच्या बदल्यास सुरवात करण्यात आली .

पशुधन पर्यवेक्षक संवर्गामध्ये विनंतीनुसार एकुण ५ अर्ज प्राप्त झाले असुन त्यापैकी ०३ अर्ज श्री. गोडघासे प.प., श्री देवळे प. प. व कु सुनिता सोळके यांची सेवा हि ५ वर्षापेक्ष कमी असल्याने त्यांना विचार करण्यात आला नाही क्रमाक १ वरती श्री. के.डी.सोळके पशुधन पर्यवेक्षक वरुन स्थानांतरण पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-२ वनोजा पं स. रिसोड येथे् मागितल्यानुसार सदर बदली ही तालुका अतंर्गत आल्याने संबंधितानी त्या तालुक्यातील गट विकास अधिकारी याच्या कडे अर्ज सादर करण्या बाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद वाशिम यांनी सुचना दिलेल्या आहेत. व २ वरती असलेले श्री. ए.के आमझरे पशुधन पर्यवेक्षक विनंती अर्जा नुसार पं स कारंजा येथे् मागितल्यानुसार पद रिक्त नसल्यामुळे बदली करण्यात आलेली नाही.

उपरोक्त प्रमाणे पशुसंवर्धन विभागामधील विनंती वरून बदली पशुधन पर्यवेक्षक संवर्गाच्या स्थानांतराची प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर उपस्थितांनी सदर समुपदेशनाने करण्यात आलेल्या स्थानांतरण कार्यवाहीस सहकार्य केल्या बाबत सर्वाचे आभार मानुन पशुसंवर्धन विभागाची स्थानांतरा बाबतची कार्यवाही पुर्ण झाल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी सांगीतले शेवटी सायंकाळी ३.०० वाजता पशुसंवर्धन विभागाची बदली प्रक्रीया पुर्ण झाल्याचे जाहीर करून सभा संपविण्यात आली.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम